**क्रमांक :२२**

# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## सोमवार, दिनांक १ एप्रिल, २०२४ / चैत्र १२, १९४६ (शके)

**२६.** सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, "जिल्हाधिकारी धाराशिव यांना सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी धाराशिव नगरपरिषद अंतर्गत तत्कालीन मुख्याधिकारी श्री.हरीकल्याण येलगट्टे व मुख्याधिकारी श्री.बाबासाहेब मनोहरे यांच्या कार्यकाळातील बायोमायनिंगच्या कामाची माहिती हिवाळी अधिवेशनासाठी मागणी करुनही ती माहिती जाणीवपूर्वक सदस्यांना न दिल्याने तसेच त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी हिवाळी अधिवेशन, २०२२ मध्ये तारांकित प्रश्न क्र.१५५८० अन्वये बायोमायनिंगच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता त्यास उत्तर देताना विद्यमान मुख्याधिकारी तथा जिल्हा सहआयुक्त श्रीमती वसुधा फड यांनी अपूर्ण, हेतुपुरस्सरपणे दिशाभूल व भ्रमनिरास करणारी चुकीची माहिती पाठवून सभागृहाची दिशाभूल केल्याने व शासनाचे अवर सचिव, उप सचिव व प्रधान सचिव यांनीही कसल्याही प्रकारची खातरजमा न करता सभागृहाला खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी उत्तरे पाठविल्याने सन्माननीय सदस्यांनी श्रीमती वसुधा फड, तत्कालीन प्रभारी सह आयुक्त व विद्यमान मुख्याधिकारी, तसेच श्री. हरीकल्याण येलगट्टे, तत्कालीन निलंबीत मुख्याधिकारी व श्रीमती सोनिया सेठी, तत्कालीन प्रधान सचिव (नवि-२) यांच्याविरुध्द दिनांक २३ जून, २०२३ रोजी दिलेली विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम २५१ मधील तरतूदींच्या अधीनतेने विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी दिनांक १९ मार्च, २०२४ रोजी सुपूर्द केली आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ एप्रिल, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(५) सचिव (२) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(६) संगणक कक्ष (WEBSITE)